N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नांदेड    **P.S.(ठाणे):** नायगांव

   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0208    **Year (वर्ष):** 2025

   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/10/2025 22:42

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

   1. **Day(दिवस):** गुरूवार
      **Time Period (कालावधी):** पहर 5
      **Date From (दिनांक पासून):** 09/10/2025
      **Date To ( दिनांक पर्यंत):** 09/10/2025
      **Time From (वेळेपासून):** 13:21 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 13:40 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

   **Date (दिनांक ):** 09/10/2025    **Time (वेळ):** 22:23 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

   **Entry No. (नोंद क्र.):** 030

   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/10/2025 22:23 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

   पूर्व, 01 किमी    **Beat No. (बिट क्र.):**

   (b) **Address (पत्ता):** जनता हायस्कुल जवळ,तलाठी सज्जा नायगाव, नायगाव,नायगाव

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): साईप्रकाश पि. नरसिंगराव चन्ना

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1984

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभागनांदेड,नांदेड,भाग्य नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभागनांदेड,नांदेड,भाग्य नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9921364600

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अशोक दिगांबर गिरी | | | 1. दत्तकुंज निवास, लोकमित्रनगर, छत्रपती चैकाजवळ ,नांदेड, नांदेड,भाग्य नगर,नांदेड,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद पोलीस स्टेशन नायगांव जि. नांदेड

दिनांक 09/10/2025

मी साईप्रकाश पि. नरसिंगराव चन्ना, वय 41 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद-पोलीस निरीक्षक, नेमणुक कार्यालय, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड मो.न.9921364600
सरकार तर्फे फिर्यादी होवून लेखी फिर्याद देतो की, मी कार्यालय पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे जून 2025 पासून पोलीस निरीक्षक म्हणून नेमणुकीस आहे.
दि. 06/10/2025 रोजी आम्ही ला.प्र.वि. कार्यालय नांदेड येथे हजर असतांना पो. उप अधीक्षक श्री प्रशांत पवार यांनी आम्हाला त्यांचे कक्षात बोलावून तक्रारदार श्री शुभम संभाजी जाधव, वय 25 वर्ष व्यवसाय शेती व व्यापार रा. कुष्णुर ता. नायगांव (खै.) जि. नांदेड यांची ओळख करून दिली. त्यांनी सदर वेळी आमच्याकडे तक्रार दिली की, माझे आजोबा नामे चितांबर गंगाराम जाधव यांचे दिनांक 19.11.2024 मध्ये निधन झाले आहे. त्यांचे नावे मौजे कुष्णुर शेत सर्वे नं. 116, 146, 407 येथे शेत जमिन आहे. दिनांक 14.07.2025 रोजी माझे वडील, आजी व आत्या यांनी कौटुंबीक वाटणी संमतीपत्र नोटरी करुन घेतले आहे. त्यानंतर मी तलाठी अशोक गिरी यांना भेटून माझे वडीलांचे नावे शेत लावण्याची विनंती केली. तेव्हा त्यांनी सांगितले की, शेत सातबारा नोंदीचा अर्ज तहसिल कार्यालयात दयावा लागतो तुम्ही तिथे जावून अर्ज करा असे म्हणाले. तेव्हा दि. 21/08/2025 रोजी मा. तहसिलदार साहेब, तहसिल कार्यालय, नायगाव (खै) येथे माझे वडीलांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनीयम 1966, कलम 85(2) अन्वये धारण जमिनीचे वाटप करण्याचा अर्ज सादर केला आहे.
त्यांनतर दि. 09/09/2025 रोजी तहसिल कार्यालयात माझे वडील व आत्या असे मंडळ अधिकारी इंगोले साहेब यांना भेटले. त्यावेळी पडताळणी करुन त्यांनी जाहिर प्रगटन काढतो असे म्हणून आम्हाला जाण्यास सागितले. तहसिल कार्यालय नायगावच्या बाहेर आल्यानंतर तलाठी गिरी मला भेटले. त्यांनी सांगितले की, आता तहसिल कार्यालयात अर्ज करण्याची गरज नाही. तलाठी म्हणून मला सातबारा नोंद करण्याचा अधिकार आहे. तुमचा अर्ज व फाईल माझ्याकडे घेवून या, मी तुमचे काम करुन टाकतो. त्यावेळी मी तहसिल कार्यालय नायगाव येथे दाखल केलेली शेत वाटणीची कागदपत्राची संचिका तलाठी गिरी यांचेकडे दिली होती.
दिनांक 29/09/2025 रोजी माझे वडीलांनी मला सांगितले की, मी दिनांक 21.08.2025 रोजी दिलेल्या अर्जाचे संबधाने तलाठी यांचेकडे विचारपूस करुन माहिती घे. त्यावरुन मी दिनांक 01.10.2025 रोजी तलाठी गिरी यांचेकडे तलाठी सज्जा कुष्णूर येथे जावून भेटलो व माझे वडीलांचे सातबारा नोंद झाली काय असे विचारले. त्यावेळी त्यांनी तुमचे वडीलांचे नावे वाटणी पत्रा आधारे सातबा-यावर नोंद करण्यासाठी नोटीस काढावी लागते. त्या कामासाठी मला 20,000/- रुपयाची मागणी केली आहे. त्यावेळी मी त्यांना 20,000/- रुपये कशाचे असे विचारले असता त्यांनी या कामासाठी मला पैसे दयावे लागतील असे सांगितले व पैशाची जोड करून 8-10 दिवसानंतर मला येण्यास सांगितले आहे.
तलाठी अशोक गिरी मागणी करीत असलेले 20,000/- रु हे कोणतीही शासकिय फिस नसुन ती लाच आहे अशी माझी खात्री झाली आहे. माझी व माझे वडीलांची लाच रक्कम देण्याची मुळीच इच्छा नाही. त्यामुळे माझे वडीलांनी तलाठी गिरी यांचे विरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे तक्रार व पुढील कार्यवाहीसाठी मला प्राधिकार पत्र दिले आहे. तलाठी गिरी यांचे सोबत माझा कोणताही देण्या-घेण्याचा आर्थिक व्यवहार नसून माझी त्यांचे सोबत वैर अगर दुश्मनी नाही.
तरी त्यानंतर मी माझ्या वडीलांचे नावे वारसा हक्काने जमीन सातबारा नोंद करण्यासाठी तलाठी अशोक गिरी यांची भेट घेण्यासाठी दिनांक 09/10/2025 रोजी तलाठी सज्जा कुष्णूर ता. नायगाव (खै) येथे जावून भेट घेणार आहे. त्या भेटी दरम्यान तलाठी गिरी यांनी स्वतः अगर ईतरामार्फत मला माझे वडीलांचे शेत जमिन वारसा हक्काने नोंद

करण्याच्या संबंधाने लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी ही विनंती. मी माझ्या तक्रारी अर्जा सोबत माझे आधार कार्ड झेराक्स प्रत, व वडीलांचे प्राधिकार पत्र देत आहे. अशी तक्रार दिली होती. त्यावरुन आम्ही लोकसेवक यांचे विरुध्द सापळा आजमाविण्याचा निर्णय घेतला. या कार्यालयाचे जा.क्र. 3870/2025 दि. 06/10/2025 रोजी मा. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांचेकडून दोन पंच नामे 1) श्री अजय विजय डवरे, पद लिपिक, नेमणुक क्षेत्रिय कार्यालय क्र. 04 नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड 2) श्री मो. वखार मो. जिलानी, पद लिपिक, नेमणुक स्वच्छ महाराष्ट्र अभियान, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांना उपलब्ध करुन घेतले.

दोन पंच प्रत्यक्ष हजर झाल्यानंतर आमचे सुचनेवरुन तक्रारदार यांनी दोन्ही पंचासमक्ष त्यांची तक्रार तोंडी कथन केली. त्यानंतर तक्रारदार यांनी लेखी दिलेली तक्रार दोन्ही पंचासमक्ष वाचण्यास दिली. त्यावेळी ती त्यांनी वाचून पाहिली असता तक्रारदार यांनी तोंडी कथन केलेली व लेखी दिलेली तक्रार एकच असल्याची खात्री झाल्याने त्यावर आम्ही व दोन्ही पंचानी सहया केल्या. त्यानंतर तक्रारदार यांना गोपनियतेच्या सुचना देवून त्यांस घरी जाण्याची परवानगी देवून दि. 09/10/2025 रोजी कुष्णुर येथे हजर राहण्याची सुचना दिली.

आज दि. 09/10/2025 रोजी आम्ही व सापळा पथकातील सदस्य सपोउपनि शेख रसुल, पोह/कणसे मपोह/मेनका पवार, चालक पोह/मामुलवार तसेच दोन पंच असे सापळा कार्यवाही कामी लागणारे सर्व साहित्यासह पुढील कार्यवाही कामी शासकिय वाहन क्रमांक एम.एच. 26 आर 0657 या वाहनाने देगलूरनाका, धनेगांव मार्ग कुष्णुर येथे रवाना झालो. मार्गस्थ असतांना आम्ही तक्रारदार यांचे मोबाईलवर संपर्क साधला असता त्यांनी आम्हांस लोकसेवक गिरी नायगांव येथील जनता हायस्कूल नायगांव येथील तलाठी सज्जा कार्यालय येथे भेटतील असे सांगितले. त्यामुळे तक्रारदार यांना साईनगरी देगांव येथे येण्यास सांगितले. आम्ही साईनगरी देगांव येथे सुरक्षीत ठिकाणी पोहोचल्यानंतर तक्रारदार पण तेथे हजर आले.

त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोह/कणसे यांनी तक्रारदार दोन्ही पंचाना डिजीटल व्हाईस रेकार्डर, मेमरी कार्ड बाबत माहिती दिली. त्यानतर वेळ 11-20 वाजता पोह/कणसे यांनी आमचे, तक्रारदार व दोन्ही पंचाचे वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकार्डरव्दारे एका नविन मेमरी कार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत केले. त्यानंतर वेळ 11-41 वाजता डिजीटल व्हाईस रेकार्डर चालु करून तक्रारदार यांचे गळ्यात लटकावुन देवून तक्रारदार व पंच क्र. 01 डवरे यांना लोकसेवक यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार यांची मोटार सायकल क्र. एम एच. 26 सी. बी. 7319 ने नायगांव येथे रवाना केले. वेळ 12-09 वाजता तक्रारदार व पंच क्र. 01 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार व पंच क्र. 01 यांना पडताळणी कार्यवाही दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारपुस केली. त्यावेळी पंच क्र. 01 यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे तलाठी सज्जा नायगांव येथे गेलो होतो. तेथे लोकसेवक मिळून आले नाहीत. त्यामुळे आम्ही परत येत असतांना तहसील कार्यालय नायगांव समोरील मुख्य रस्त्यावरुन लोकसेवक हे त्यांचे कार मध्ये नायगांवचे दिशेने येत असतांना तक्रारदार यांना दिसून आले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना आवाज देवून थांबविले. गिरी साहेब आपले काम करा, नोटीस काढल्या की असे म्हणाले. त्यावेळी लोकसेवक गिरी यांनी पैसे घेवून ये असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार यांनी एक दिड महिना झाला देतो की असे म्हणाले. त्यावेळी लोकसेवक गिरी यांनी बाबा , तस पुढ द्यावाव लागतात, माझे खिष्यातून देवू काय सगळे, काम करुन घ्यायच म्हणल्यावर काही बी करुन जोड करावी लागते असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी थोडफार देतो, नोटीस काढा, नंतर देतो असे म्हणाल्याने लोकसेवक यांनी किती वेळान आणतूस, पंधरा हजार आता दे, पांच हजार नंतर दे नोटीस काढल्यावर असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार यांनी आता तेवढे होयना हो असे म्हणाले त्यावेळी लोकसेवक यांनी दहा दे आता असे म्हणाले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना पडताळणी कार्यवाही दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारपुस केली. त्यावेळी त्यांनी पंच क्र. 01 यांनी सांगितलेल्या हकीकत प्रमाणे सांगितले आहे. त्यानंतर आम्ही, पंच तसेच सापळा पथक सदस्य असे तक्रारदार व लोकसेवक गिरी यांचे भेटी दरम्यान डिजीटल व्हाईस रेकार्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. एकंदरीत लोकसेवक गिरी यांनी तक्रारदार यांचे काम करण्यासाठी 20,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 10,000/-रुपये लाच स्विकारण्याचे स्पष्ट मान्य केल्याचे निश्पन्न झाले. त्यानंतर लाच स्विकृती सापळा कार्यवाही करण्याचे ठरले.

त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे बचती मधून 10,000/- रुपये रक्कम (ज्यात 500/- रुपये दराच्या 20 भारतीय चलनी नोटा) पंचासमक्ष हजर केल्या. त्यावेळी पंच क्र. 02 यांनी नोटांचे क्रमांक एका कागदावर हस्ताक्षरात लिहुन घेतले. लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर नियोजित ईशारा करण्याचे तक्रारदार व पंच क्र. 01 यांना सुचना दिल्या. त्यानंतर सपोउपनि शेख रसूल यांनी लाच रक्कम 10,000/- रुपये (ज्यात 500/- दराच्या 20 भारतीय चलनी नोटा) अॅन्थ्रासिन पावडर लावुन तक्रारदार यांचे शर्टच्या समोरील डावे खिशात अलगद ठेवून दिले.

त्यानंतर वेळ 13-21 वाजता पोह/कणरो यांनी डिजीटल व्हाईस रेकार्डर चालू करुन तक्रारदार यांचे गळयात लटकावून देवून तक्रारदार यांना लोकसेवक यांची भेट घेवून लोकसेवक यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणे कामी पंच क्र. 01 यांचे सोबत मोटार सायकलने तलाठी सज्जा नायगांव येथे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही व सापळा पथक असे शासकीय वाहनाने नायगांव येथील डॉ.हेडगेवार चैक येथे वाहने सोडून पायी तलाठी सज्जा नायगांव येथे गेलो.
वेळ 1340 वाजता पंच क्र. 01 यांनी लोकसेवक हे लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा केला त्यावेळी आम्ही लोकसेवक हे हजर असलेले तलाठी सज्जा नायगांव येथे पोहचून आमचा व सापळा पथकाचा परिचय करुन देवुन त्यांना ताब्यात घेतले. लोकसेवक यांचे ताब्यातून तक्रारदार याचेकडून स्विकारलेली अन्थ्रासिन पावडर यूक्त 10,000/- रुपये लाच रक्कम हस्तगत करण्यात आली.
त्यानंतर पंच क्र. 01 यांना डिजीटल व्हाईस रेकार्डर चालु करून दिल्या पासुन ते लोकसेवक यांनी लाच स्विकारले बाबतचा ईशारा मिळेपर्यंत काय हकीकत घडली. तेव्हा पंच क्र. 01 यांनी सांगितले की, तक्रारदार व मी जनता हायस्कूल जवळील तलाठी सज्जा नायगांव येथे गेलो. तेथे लोकसेवक गिरी व इतर जण बसलेले होते. तक्रारदार यानी लोकसेवक यांना साहेब पैसे असे म्हणून लोकसेवक यांना पैसे दिले. लोकसेवक यांनी पैसे स्विकारुन उद्या काढतो नोटीस तुझी, उद्या सह्या घेतो असे म्हणाले. त्यानंतर लोकसेवक यांनी लाच रक्कम स्विकारल्याचे पाहून लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा सापळा पथक सदस्यांना केला आहे.
तरी तक्रारदार श्री शुभम संभाजी जाधव, रा. कुष्णुर ता. नायगांव (खै.) जि. नांदेड यांनी दिनांक 06/10/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे दिलेल्या तक्रारी वरून दिनांक 09/10/2025 रोजी करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक श्री अशोक दिगांबर गिरी, वय 46 वर्श, व्यवसाय तलाठी, नेमणुक तलाठी सज्जा कुष्णुर ता. नायगांव (खै) जि. नांदेड मुळ रा. आझाद चैक हदगांव ता. हदगांव जि. नांदेड ह.मु. दत्तकुंज निवास, लोकमित्रनगर, छत्रपती चैकाजवळ नांदेड यांनी तक्रारदार यांचे वडिलांचे नांवे शेती वारसाहक्काने सातबा-यावर नोंद करण्यासाठी तहसिल कार्यालय नायगांव समोर मुख्य रस्त्यावर तक्रारदार यांना 20,000/- रुपये रक्कमेची मागणी करून तडजोडी अंती 10,000/-रुपये लाच रक्कम स्विकारण्याची संमती दिली. त्यानंतर जनता हायस्कूल जवळील तलाठी सज्जा नायगांव येथे 10,000/- रुपये लाच रक्कम तक्रारदार यांचे कडून स्विकारली. म्हणून माझी लोकसेवक श्री अशोक दिगांबर गिरी, वय 46 वर्श, व्यवसाय तलाठी, नेमणुक तलाठी सज्जा कुष्णुर ता. नायगांव (खै) जि. नांदेड यांचे विरुध्द कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

ही फिर्याद दिली सही,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Subhashchandra Narayan markad(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची सवाक्षरी)
**Name** (नाव): Subhashchandra Na
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस ठाणे नायगाव